# डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या सामाजिक व धार्मिक चळवळी आणि धर्मातरित बौध्दांमध्ये झालेले परिवर्तन एक दृष्टीक्षेप

**प्रा. डॉ. कल्पना मो. सांगोडे**
एस. एस. जॉयस्वाल कॉलेज अर्जुनी/मोर.
जि. गोंदिया

---

**प्रस्तावना :**

शतकानुशतके अस्पृश्य म्हणून गणलेल्या समाजाचे मुक्तिदाते, स्त्रियांना हिंदु कोड बिलातून माणुसकीचा हक्क देणारे, "प्रथम मी भारतीय" म्हणून देशाभिमान बाळगणारे सिम्बॉल ऑफ नॉलेज म्हणून प्रसिध्द डॉ. बाबासाहेब भारताचे नवनिर्माते आहेत. ते भारतीय न्यायशास्त्रज्ञ, कार्यशास्त्रज्ञ, राजकरणी, तत्वज्ञ आणि समाजसुधारक होत. त्यांनी अस्पृश्य बौध्द चलवळीला प्रेरणा दिली आणि अस्पृश्य लोकांविरुध्द होणारा समाजिक भेदभाव नष्ट करण्यासाठी चळवळ उभारली. तसेच महिलांच्या आणि कामगारांच्या हक्कांचे कायदे केले. नागपूरच्या भूमीत बौध्द धम्माची दीक्षा आपल्या लाखो अनुयायांना देऊन रक्तहीन क्रांती केली. त्याची नोंद संपूर्ण जगाने घेतली.

वास्तविक पाहता डॉ. बाबासाहेब आंबेडकराने आपल्या सामाजिक लढ्याची सुरवात विदेशात आपले शिक्षण पूर्ण करुन भारतात परतल्यावर डॉ. आंबेडकरांनी काही काळ बडोदा संस्थानात नोकरी केली. परंतु ते अस्पृश्य समाजाचे असल्यामुळे त्यांना कटू अनुभवाला सामोरे जावे लागले. म्हणून त्यांनी त्या नोकरीचा त्याग केला. त्यानंतर मुंबईच्या सिडनेहॅम कॉलेज ऑफ कॉमर्समध्ये अर्थशास्त्राचे प्राध्यापक म्हणून कार्य करु लागले. तेथेच सामाजिक कार्याकडे त्यांचा ओढा निर्माण झाला. आपल्या समाजबांधवांच्या उद्धारासाठी काही तरी केले पाहिजे असे त्यांना मनोमन वाटत होते. त्यामुळे सामाजिक कार्याचे आकर्षण निर्माण होऊन, कोल्हापूरच्या छत्रपती शाहू महाराज यांच्याकडून मिळालेल्या मदतीवर 'मूकनायक' नावाचे पाक्षिक सुरु केले आणि ठिकठिकाणी आयोजित केलेल्या अस्पृश्यता निवारण परिषदांमध्ये त्यांनी भाग घेतला. डॉ. आंबेडकर भारतीय समाजातील एक मोठ्या लोक समूहाला अनेक शतकांच्या दास्यातून व अपमानाच्या गर्तेतून मुक्त करणाऱ्या चळवळीचे नेतृत्व करू लागले आणि हळूहळू राजकीय लढ्याच्या प्रक्रियेत अस्पृश्य समाजाचा दबाव व प्रभाव गट निर्माण करून न्याय, हक्क व अधिकार प्राप्त करण्याकरीता संघर्षात सर्वांना सहभागी करून चळवळी सुरु केल्या.

**डॉ. आंबेडकरांनी काढलेल्या वृत्तपत्रातून समाज क्रांतिकारी विचार :**

"मूकनायक" डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी 31 जानेवारी 1920 रोजी मूकनायक हे वृत्तपत्र काढले तसेच 3 एप्रिल 1920 रोजी "बहिष्कृत भारत" हे दुसरे वृत्तपत्र काढून वृत्तपत्रांच्या माध्यमातून खऱ्या अर्थाने अस्पृश्य समाजात चेतना निर्माण करुन सामाजिक विषमते विरुध्द क्रांती करण्यास प्रवृत्त केले. या वृत्तपत्रातून त्यांनी दलितांच्या दु:खाना वाचा फोडली आणि अस्पृश्य बांधवांच्या अन्यायाचा प्रतिकार करण्यास आणि न्याय हक्कासाठी सज्ज झाले.

**दलितांच्या न्याय हक्कासाठी सामाजिक व धार्मिक चळवळी :**

**महाडचा चवदार तळ्याचा सत्याग्रह :**

महाड येथील चवदार तळ्याचे पाणी भरण्यास(पिण्यास) अस्पृश्यांना मज्जाव होता त्यामुळे 20 मार्च 1927 रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी रायगड जिल्हातील महाड येथील सार्वजनिक तळ्याचे पाणी अस्पृश्यांना घेता यावे म्हणून सत्याग्रह केला. डॉ. बाबासाहेबआंबेडकरांनी उभारलेली ती एक सामाजिक चळवळ होती. ज्याचा उद्देश दलितांना सार्वजनिक जल स्त्रोतापर्यंत पोहविण्याचा त्यांना अधिकार मिळवून देण्याचा होता. तळ्याच्या पाण्यावर अस्पृश्यांचा ही हक्क आहे. याची जाणीव करुन दिला. लोकांना मोठ्या संख्येने एकत्र येऊन केलेली पहिली सामाजिक कृती होय.

**मनुस्मृतीचे दहन व स्त्रीमुक्ती :**

मनुस्मृती या धर्मग्रंथाने जन्मधिष्ठित वर्णव्यवस्थेचे समर्थन करुन सामाजिक विषमतेचे खतपाणी घालून जातिव्यवस्थेला आधार प्राप्त करून दिला. सामाजिक विषमता, मानवतेला काळिमा फासणारा आणि उच्चनीच भेदभाव समाजाला घातकच असून राष्ट्रवादाचा शत्रू आहे आणि म्हणून डॉ. आंबेडकरांनी मनुस्मृतीचे दहन करून समाजातील विषमता दूर करण्याचा प्रयत्न केला. वरील कृतींना प्रतिकात्मक अर्थ होता. त्याद्वारे आंबेडकरांना हे दाखवून द्यायचे होते की, उच्चवर्णीयांनी अस्पृश्यांना वर्षानुवर्षे त्यांच्या हक्कांपासून वंचित ठेवले असले तरी यापुढे अस्पृश्य बांधव न्याय हक्कांसाठी संघर्ष करतील त्यांच्या या कार्यामुळे अस्पृश्यांचे अस्मिता जागृत झाली. परिणामी दलित स्त्रिया स्वतंत्रपणे संघटित होऊ लागल्या. त्यांच्या प्रयत्नातूनच २५ डिसेंबर १९२७. हा मनुस्मृती दहनाचा दिन भारतीय स्त्रीमुक्ती दिन साजरा केला जातो.

**काळाराम मंदिर प्रवेश :**

हिंदू समाजाच एक घटक असताना अस्पृश्यांना मंदिर प्रवेशापासून वंचित ठेवले जात होते. तेव्हा त्यांना मंदिरात प्रवेश मिळाला पाहिजे यासाठी बाबासाहेबांनी मंदिर प्रवेश सत्याग्रह करण्याचे ठरविले. मंदिर प्रवेश संदर्भात विविध प्रतिक्रिया होऊन अस्पृश्यांसाठी वेगळी मंदिरे बांधण्याचा पर्याय मांडला गेला. परंतु अशी मंदिरे बांधणे म्हणजे पुन्हा भेदभावाला खतपाणी घातल्यासारखे होते. जी मूळ समस्या समतेची वागणूक अस्पृश्यांना मिळावी ही तशीच राहणार होती. म्हणून डॉ. आंबेडकरांनी देवदर्शनापेक्षा सामाजिक समता प्रस्थापित करण्यासाठी मंदिर प्रवेश आवश्यक वाटत होता. स्वतंत्र देवळे आम्हास नको आहेत. सवर्णासाठीच्या मंदिरात अस्पृश्यांना प्रवेश हाच यावर खरा उपाय होवू शकतो, असे त्यांचे मत होते.

नाशिक येथील काळाराम मंदिर प्रसिद्ध होते. तेथे ३ मार्च १९३० रोजी सत्याग्रह केल्या गेला आणि त्यानंतर १५००० स्वयंसेवक ५०० स्त्रियांनी भाग घेऊन अनेक दिवस तो लढा सुरु ठेवला. तसाच सत्याग्रह अमरावतीतील अंबादेवीच्या मंदिरात करण्यात आला व इतर अनेक ठिकाणी मंदिर प्रवेश सत्याग्रह सुरु केला.

**बौध्द धम्मात प्रवेश :**

सवर्णांकडून अस्पृश्यांना समतेची वागणूक मिळणार नाही म्हणून १९३५ मध्ये नाशिक जिल्ह्यातील येवला

येथिल झालेल्या अस्पृश्यांच्या परिषदेत त्यांनी दुर्दैवाने 'मी हिंदू म्हणून अस्पृश्य जातीत जन्माला आलो हा काही माझा अपराध नाही. परंतु मरताना मात्र मी हिंदू म्हणून मरणार नाही', असे विचार व्यक्त केले आणि धर्मांतर करताना भारत मातेच्या उदरातून उदय होणाऱ्या व तिच्या संस्कराने नटलेल्या संस्कृतीशी एकरुप असलेल्या बौद्ध धर्माची निवड केली. धर्मांतरासाठी बौद्ध धर्माची निवड करण्यात देखील आंबेडकरांचे दूरदर्शित्व व राष्ट्रहिताची तळमळ यांचे दर्शन होते.

विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी 14 ऑक्टोंबर 1956 रोजी नागपूरच्या दीक्षाभूमी वर पाच लाख अस्पृश्यांना बौध्द धमाची दीक्षा दिली. ही एक ऐतिहासिक आणि क्रांतीकारी घटना आहे. आधुनिक काळात बाबासाहेबांनी घडवून आणलेली ही फार मोठी धम्मक्रांती आहे. भारतातील जातीव्यवस्थेने ज्याचे सामाजिक, धार्मिक, मानसिक, सांस्कृतिक,आर्थिक इ. सर्वच प्रकारचे अमानवीय शोषण केले होते. त्या समाजात आपल्या क्रांतिकारी विचार आणि चळवळीच्या माध्यमातून डॉ. आंबेडकरांनीही क्रांती घडवून आणली.

हिंदू धर्मात जातिव्यवस्थेच्या शोषणाचा बळी ठरलेल्या अस्पृश्यांना 'माणूस' म्हणून जगण्यासाठी बाबासाहेब यांनी बौध्द धम्म दिला. विज्ञाननिष्ठ आणि मानवतावादी बौध्द धम्म अस्पृश्यांना मिळाला आणि धर्मांतरानंतरच पूर्वीचा अस्पृश्य समाज बौध्द झाला. बौध्द धम्माचा स्विकार ही त्यांच्या जीवनातील अत्यंत क्रांतीकारी घटना ठरली.

बौध्द धर्माचा स्विकार केल्यानंतर धर्मातरीत बौध्दांना आपल्या प्रगतीचा व विकासाचा मार्ग सापडला. काल पर्यंतअस्पृश्य म्हणून गणल्या गेलेला समाज 'बौध्द' म्हणून बुध्द धम्माच्या मार्गाने वाटचाल करु लागला. बौध्द धम्मामुळे बौध्दांना नवीन विचारसरणी मिळाली. ही विचारसरणी त्यांच्या दृष्टी कोनातून क्रांतीकारी होते. बौध्दांनी बाबासाहेब आंबेडकरांचे विचार आणि बौध्दधम्म केवळ पोटात गिळला नाही तर तो त्यांनी आपल्या डोक्यात ठेवला.

**दलितांनी धर्मांतर केल्यामुळे घडून आलेले परिवर्तन :**

शतकानुशतके हिंदू धर्मग्रंथाच्या आदेशानुसार वागणारा हा अस्पृश्य समाज आपल्या सदसद विवेक बुध्दीने विचार करुन वागू लागला. बौध्दामध्ये झालेला हा परिवर्तन म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या धम्मक्रांतीचा परिणाम होता. बौध्द धम्माच्या स्विकारानंतर बौध्द धर्मांतरित बौध्द समाजात प्रचंड परिवर्तन घडून आले. कोणत्याही परिवर्तनाचा आरंभ हा विचारातून होत असतो. आता बौध्द समाज विचारपुर्वक कृती करु लागला. त्यामुळे धर्मांतरच्या 68 वर्षात बौध्यांनी जाणीवपूर्वक परिवर्तन घडवून आणले. हे परिवर्तन समाज जीवनाच्या केवळ एका क्षेत्रापुरते मर्यादित नव्हते तर जीवनाच्या सर्व क्षेत्रात हे परिवर्तन घडून आले. या परिवर्तनातून त्यांचा प्रचंड विकास घडून आला.

**सामाजिक परिवर्तन :**

बौध्द धम्माच्या स्विकारानंतर धर्मांतरीत बौध्दांनी पारंपारिक मुल्ये, जूनी रुढी परंपरा नाकरल्या त्याऐवजी बौध्द धम्मानुसार नवी सामाजिक मूल्ये स्विकारली त्यामुळे त्यांना प्रस्थापित व्यवस्थेशी संघर्ष करावा लागला.

Research Hub International Journal

त्यांनी स्विकारलेल्या नव्या प्रथा आणि परंपरा मानवतावादी आणि वैज्ञानिक आहे. त्यामुळे त्यांच्यात परिवर्तन घडून येऊन त्यांचा विकास झाला. जे आजही जून्या बुरसटलेल्या प्रथा परंपराना चिकटून आहेत त्यांच्यात स्वसन्मान, स्वप्रतिष्ठा आणि अस्मिता निर्माण होऊ शकली नाही. अजूनही ते लाचारिचे जीवन जगत आहेत. परंतू धर्मांतरित बौध्दांमध्ये मात्र स्वसन्मान, प्रतिष्ठा, मानसन्मान व अस्मिता निर्माण झाली आहे. आणि ते 'माणूस' म्हणून सन्मानाने जगत आहेत.

**शैक्षणिक परिवर्तन :**

अस्पृश्यांना शिक्षण घेण्याचा अजिबात अधिकार नव्हता. बौध्द धर्मात प्रवेश केल्यानंतर त्यांना शिक्षणाचे महत्वकळले. शिक्षणाविषयी त्यांच्यात प्रचंड प्रमाणात जागृती झाली. शिक्षणाशिवाय आपले अस्तित्वच नाही याची जाणीव झाली शिक्षण हाच विकासाचा मार्ग आहे. शिक्षणाद्वारेच आपला सर्वांगीण विकास होऊ शकते त्यांच्या लक्षात आले.शेकडो वर्षापासुन शिक्षणापासून वंचित असलेला बौध्द समाज शिक्षणाकडे वळला. आपल्या मुलांना अतिशय प्रतिकूल परिस्थिती मध्ये शिकविले अतिशय हलाखीच्या परिस्थितीत कठोर परिश्रम घेऊन आपल्या कार्यकर्तृत्वाने शिक्षण क्षेत्रात यश संपादन केले. आपल्या मुलांनी उच्च शिक्षण घेतले पाहिजे, उच्च पद प्राप्त केले पाहिजे अशा आशा-आकांशा पालकांमध्ये निर्माण झाल्या. धर्मांतरीत बौध्दांमध्ये शैक्षणिक क्रांतीझाली. इतर धर्माच्या तुलनेत बौध्दांमध्ये शिक्षणाचे प्रमाण जास्त आहे. बौध्दांचा शैक्षणिक विकास हा धम्म क्रांतीचा परिणाम होय.

**धार्मिक व सांस्कृतिक परिवर्तन :**

बौध्द धम्माचा स्विकार केल्यामुळे अस्पृश्यांच्या धार्मिक जीवनात आमुलाग्र परिवर्तन घडून आले. त्यांच्या प्रचंड धार्मिक विकास झाला. कोणताही देव आपले भविष्य घडवू शकत नाही. तर आपल्यालाच आपले उज्ज्वल भविष्य घडवायचे आहे. असा विचार करुन ते आपला विकास करु लागले. बौध्द धम्माचा स्विकारानंतर त्यांनी सर्व प्रकारच्या धार्मिक रुढी, परंपरांचा त्याग केला धार्मिक रुढी, परंपरांचा त्याग करणे ही साधी बाब नव्हती. परंतू बौध्द लोकांनी जाणीवपूर्वक या सर्व परंपरागत धार्मिक संस्कारांना आपल्या जीवनातून हद्दपार केले. बौध्दांनी पारंपरिक सण, उत्सव नाकरले. 'बुध्द जयंती', 'धम्मचक्र प्रवर्तनदिन', 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती' इ. बौध्द धम्माशी आणि चळवळीशी संबधित महत्वपूर्ण दिवस पाळू लागलेत. दीक्षाभूमी व चैत्यभूमी ही त्यांची क्रांतिभूमी आणि प्रेरणाभूमी बनली. बौध्द लोक सारनाथ, बौध्दगया, लुंबिनी, कुशीनगर इ. बौध्द स्थळांना भेटी देवू लागलेत.एकंदरीत धर्मातरित बौध्दांनी बौध्द धर्माशीसंबंधितअशी आपली संस्कृती निर्माण केली. बौध्द धम्म हा माणुसकीचा धम्मआहे. त्यात कोणत्याही प्रकारची विषमता नाही. भेदाभेद-जातीभेद नाही. बौध्द धम्मानुसारआचरण केल्यास आपण आपली आणि राष्ट्राची प्रगती करू शकतो असा विश्वास त्यांच्यात निर्माण झाला. बौध्द धम्मात प्रवेश केलेल्या बौध्यांनी आपली पारंपारिक सांस्कृतिक व्यवस्था नाकारली आणि बौध्द धर्मावर आधारित आपले सांस्कृतिक विश्व निर्माण केलेले दिसून येते.

एकंदरीत बौध्द धर्मात प्रवेश केल्यानंतर त्यांच्यामध्ये गतीशिलता निर्माण होऊन आर्थिक परिवर्तन होऊन त्यांचा आर्थिक विकास घडुन आला. आज सर्वच क्षेत्रात बौध्दांनी प्रगती केलेली दिसून येते. थोडक्यात कालपर्यंत

मानवी हक्कापासून वंचित व लाचारित जीवन जगत असलेल्या अस्पृश्य लोकांनी बुध्द धम्माचा स्विकार केल्यानंतर आज त्यांच्यात खूप परिवर्तन घडून आले. जीवनाच्या सर्वच क्षेत्रात विकासाच्या दिशेने वाटचाल सुरु आहे. त्यांचा सामाजिक दर्जा उंचावला व देशाच्या राजकिय जीवनात त्यांना प्रतिष्ठेचे स्थान प्राप्त झाले.

दलितांना सामाजिक व राजकीय प्रतिष्ठा प्राप्त झाली. धम्म परिवर्तानातून घडुन आलेली क्रांती ही मानवी उत्थानाची नवा इतिहास रचनारा ठरली. 'पीडीत वंचितामधील हीनत्वाची,न्यूगंडाची भावना नष्ट झाली. त्यांच्यात आत्मविश्वास व आत्मतेज व नवचैतन्य निर्माण झाले. अस्पृश्य समाजाला 'बौध्द समाज' म्हणून ओळख प्राप्त झाली. शिक्षणातील प्रगती साधली गेल्याने प्रतिष्ठीत समाज म्हणून त्यांची ओळख निर्माण झाली.

डॉ. आंबेडकरांनी सुरु केलेल्या चळवळीमुळे भारतीय समाजाची वृत्ती व वर्तन यात मंदगतीने का असेना, पण परिवर्तन होऊ लागले. अस्पृश्य समाज आपल्या हक्काविषयी जागृत झाला. न्याय हक्क मागून न मिळाल्यास संघर्ष करून हिसकावून घेऊ, अशी जिद्द निर्माण झाली. परिणामी अस्पृश्य समाजाच्या लोकांना सामाजिक जीवनात प्रतिष्ठा मिळून, सामाजिक दर्जा उंचावला गेला. त्यांच्या विषयीचा भेदभाव आज बऱ्याच अंशी दूर झाला हे डॉ. आंबेडकरांच्या चळवळीचे आणि संघर्षाचे फळ होय आणि म्हणून देशातील सर्व राजकीय पक्ष यांना त्यांच्या संघशक्तीची दखल घेणे भाग पडले आणि देशांच्या राजकीय जीवनात प्रतिष्ठेचे स्थान प्राप्त झाले.

**संदर्भ ग्रंथ :**

- भोळे भा.ल.- राजकीय विचार, पिंपळापूरे ॲण्ड क. पब्लिशर्स नागपूर
- देशपांडे व तु. – आधूनिक भारताचा इतिहास, के. सागर पब्लिकेशन, पुणे
- फडके य.दि. – आंबेडकरी चळवळ, श्री. विद्या प्रकाशन पुणे
- कीर धनंजय- डॉ. बाबासाहेब आंबेडकर, प्रकाशक रामदास भटकळ, पॉप्यूलर प्रकाशन मुंबई

Research Hub International Journal